## निवडक

### क्लब वर्ल्ड कपमध्ये मँचेस्टर सिटीचा विजयी प्रारंभ



**नवी दिल्ली, दि. १९ :** मँचेस्टर सिटीने क्लब वर्ल्ड कप स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात वायदाद कॅसाब्लांकावर २–० असा विजय मिळवत दमदार सुरुवात केली. या विजयानंतर सिटीचे प्रशिक्षक पेप गार्डिओला यांनी संघातील नवख्या खेळाडूंनी दाखवलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

सामन्यात डच मिडफिल्डर तिजानी रीजंडर्स आणि फ्रेंच आक्रमक रायन चेर्की यांनी पहिल्यांदाच सिटीच्या संघात स्थान मिळवले. दोघेही एसी मिलान आणि ल्योन या क्लब्समधून नुकतेच सिटीमध्ये दाखल झाले आहेत. या दोघांनी फिलाडेल्फियातील *लिंकन फायनान्शियल फील्डवर तगड्या स्पर्धेच्या वातावरणात आपली छाप सोडली.

गार्डिओला म्हणाले की , रीजंडर्स हा एक अत्यंत प्रगल्भ खेळाडू आहे. त्याच्या खेळात जो वेग आणि नियंत्रण आहे, तो अधिक स्थिर लयीत खेळू लागला की तो आमच्यासाठी अमूल्य ठरेल.

दरम्यान, केविन डी ब्रुयनच्या अनुपस्थितीत रायन चेर्कीला स्थान देण्यात आले. २१ वर्षीय चेर्कीने सुमारे एक तास खेळून स्थानकबद्ध कामगिरी केली आणि नंतर त्याला बदली खेळाडू म्हणून मैदानाबाहेर घेतले गेले. याबतीत गार्डिओला म्हणाले,केविनसारख्या खेळाडूची जागा घेणे सहज शक्य नाही. पण चेर्कीकडे गोल क्षेत्राजवळ असामान्य दृष्टी आणि कौशल्य आहे. ही फक्त सुरुवात आहे, पण मी समाधानी आहे की तो आमच्यासोबत आहे.

या सामन्यात सिटीच्या संघात प्रायोगिक स्वरूप पाहायला मिळाले. ब्राझिलियन डिफेंडर व्हिटर रीसने तिसऱ्यांदा सुरुवात केली, तर नॅथन ॲकेने अनेक महिन्यांनंतर क्लबकडून पहिल्यांदा खेळ केला. गार्डिओलाने स्पष्ट केले की,आमच्याकडे अनेक नवीन खेळाडू होते, काहींना वेळ देणे गरजेचे होते. पुढील सामन्यासाठी संघात जवळपास १० बदल होतील.

गेल्या हंगामातील प्रमुख खेळाडू जोस्को ग्वार्डिओल, बर्नार्डो सिल्वा, एर्लिंग हालँड, रुबेन डायस आणि इल्के गुंडोगन हे सर्व खेळाडू या सामन्यासाठी बेंचवर ठेवण्यात आले होते. नवीन भरती रायन एट–नौरी यालाही सामन्यात उतरवण्यात आले नाही.

या सामन्यातील सर्वाधिक लक्षवेधी कामगिरी फिल फोडेन याची होती. त्याने सामन्यात पहिला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली आणि दुसऱ्या गोलासाठी मदतही केली.गेल्या हंगामात मी माझ्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नव्हतो. त्यामुळे या हंगामात सुरुवात चांगली करायची होती. आज मी संघासाठी योगदान देऊ शकलो, याचा आनंद आहे,असे फोडेन म्हणाला. सिटीचा पुढील सामना रविवारी अल ऐन संघाविरुद्ध होणार आहे.

# गिल चौथ्या स्थानी तर पंत पाचव्या : नायरला दुखापत

**लीड्स, दि. १९ :**

भारत आणि इंग्लंड यांच्यात शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी टीम इंडियाच्या फलंदाजी क्रमाबाबत अनेक चर्चांना उधाण आले आहे. हेडिंग्ले येथे होणाऱ्या पहिल्या कसोटीत भारताचा उपकर्णधार ऋषभ पंतने बुधवारी पत्रकार परिषदेत या चर्चांवर काही अंशी पडदा टाकत, स्वत: आणि शुभमन गिलच्या स्थानांची पुष्टी केली.

पंतने स्पष्ट केले की, शुभमन गिल चौथ्या क्रमांकावर, तर तो स्वतः पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करेल. मात्र, क्रमांक तीनसाठी अंतिम निर्णय अद्याप झाला नसल्याचेही त्याने यावेळी सांगितले.

क्रमांक तीनसाठी अजून चर्चा सुरू आहे. पण चौथा आणि पाचवा क्रमांक निश्चित आहेत. शुभमन गिल चौथ्या स्थानी खेळेल आणि मी पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करणार आहे, असे पंतने सांगितले.

भारताच्या संघ रचनेबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात असताना, सलामी जोडीविषयी मात्र पंतने स्पष्टता दिली नाही. यशस्वी जयस्वालसोबत दुसरा सलामीवीर कोण असेल हे गुलदस्त्यातच राहिले आहे. के.एल. राहुल क्रमांक तीनसाठी संभाव्य पर्याय मानला जात असला तरी, तो सलामीस उतरेल की नाही, हे अद्याप ठरलेले नाही. साई सुदर्शन आणि करुण नायर यांच्यात या स्थानी निवड होण्याची शक्यता आहे.



दरम्यान, इंग्लंडने बुधवारी आपला पहिल्या कसोटीसाठीचा अंतिम संघ जाहीर केला असून, अनुभवी खेळाडूंना प्राधान्य देत काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

ख्रिस वोक्स याची पुनरागमनासह संघात एंट्री झाली आहे. तो सॅम कुकच्या जागी खेळणार असून, मागील दोन कसोट्यांमध्ये घोट्याच्या दुखापतीमुळे तो अनुपस्थित होता. हॅमस्ट्रिंगच्या समस्येमुळे बाहेर असलेल्या गस ॲटकिन्सनच्या जागी ब्रायडन कार्स याचा समावेश करण्यात आला आहे.

वोक्स आठव्या क्रमांकावर खेळणार असून, त्यामुळे इंग्लंडच्या अष्टपैलू क्षमतेत अधिक भर पडली आहे. यामुळे सातव्या स्थानावर यष्टीरक्षक जेमी स्मिथ याला संधी देण्यात आली आहे, आणि फलंदाजी विभागात सखोलता राखली आहे.

याशिवाय, २१ वर्षीय युवा खेळाडू जेकब बेथेल याला संघातून वगळण्यात आले असून, त्याच्या जागी उपकर्णधार ऑली पोप याला तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

ऑली पोपने झिम्बाब्वेविरुद्ध १७१ धावांची खेळी केली होती, मात्र भारत आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८ कसोट्यांमध्ये त्याची सरासरी केवळ २२.०५ इतकी राहिली आहे जी त्याच्या कारकिर्दीच्या एकूण सरासरीपेक्षा खूपच कमी आहे.संघ व्यवस्थापनाने अनुभवाला प्राधान्य देत हा निर्णय घेतल्याचे संकेत आहेत.

**इंग्लंड संघ – पहिली कसोटी**

झॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप (उपकर्णधार), जो रूट, हॅरी ब्रूक, बेन स्टोक्स (कर्णधार), जेमी स्मिथ (यष्टीरक्षक), ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्स, जोश टंग, शोएब बशीर. या कसोटी मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या अनुपस्थितीत भारताची फलंदाजी रचना कशी उभी राहते, याकडे साऱ्या क्रिकेटजगताचे लक्ष लागून राहिले आहे.

### करुण नायरला दुखापत; कसोटीपूर्वी भारतासमोर अडचण

**इंग्लंडविरुद्ध शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय संघाला मोठा धक्काबसला आहे. फलंदाज करुण नायरला सरावादरम्यान दुखापत झाल्याने त्याच्या खेळण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

**लीड्समध्ये नेटमध्ये सराव करताना वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाचा एक चेंडू नायरच्या बरगड्यांवर बसला, आणि त्यानंतर त्याला अस्वस्थता जाणवू लागली. नायरची तपासणी सुरू असून, दुखापतीचे गांभीर्य अद्याप स्पष्ट झालेले नाही.**

**२०१७ नंतर नायरच्या पुनरागमनाची ही संधी होती. स्थानिक क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरीमुळेत्याने पुन्हा राष्ट्रीय निवडकर्त्यांचे लक्ष वेधले होते. मात्र दुखापतीमुळे त्याचे पुनरागमन लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

# ‘एलए लेकर्स ’विक्रीच्या उंबरठ्यावर; विक्रमी ८६ हजार कोटींचा करार

**लॉस एंजेलिस, दि. १९ :**

अमेरिकेतली सर्वात बलाढ्य बास्केटबॉल संघ ’ लॉस एंजेलिस लेकर्स ’विक्रीसाठी सज्ज झाला असून, हा व्यवहार तब्बल १० अब्ज डॉलर (सुमारे ₹८६,००० कोटी रुपये) इतक्या विक्रमी रकमेत होणार असल्याची माहिती ’ ईएसपीएन’ च्या रिपोर्टमधून समोर आली आहे. या विक्रीनंतर लेकर्स हा अमेरिकेच्या इतिहासातील सर्वाधिक मूल्यवान क्रीडा संघ ठरणार आहे.

या विक्रीनंतर लेकर्समधील बस कुटुंबाचा ४६ वर्षांचा ताबा समाप्त होणार आहे. संघातील नियंत्रण अब्जाधीश उद्योजक मार्क वॉल्टर यांच्याकडे जाईल, जे सध्या या संघाचे अल्पसंख्याक भागीदार आहेत. तरीही, जीनी बसलेकर्सच्या गव्हर्नरपदावर कायम राहतील, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

वॉल्टर हे टीडब्ल्यूजी ग्लोबल या होल्डिंग कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी असून, त्यांच्याकडे याआधीच एलए डॉजर्स (बेसबॉल), एलए स्पार्क्स , इंग्लंडचा चेल्सी फुटबॉल क्लब, तसेच बिली जीन किंग कप टेनिस स्पर्धा आणि कॅडिलॅक फॉर्म्युला वन संघ यांचा ताबा आहे. आता लेकर्सच्या समावेशामुळे त्यांच्या स्पोर्ट्स



पोर्टफोलिओला आणखी प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे.

लेकर्सचे माजी दिग्गज खेळाडू आणि वॉल्टर यांचे व्यावसायिक भागीदार एर्विन मॅजिक जॉन्सन यांनी या विक्रीबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे.मार्क हा जिंकण्याच्या वृत्तीने प्रेरित आहे आणि तो लेकर्ससाठी योग्य संरक्षक ठरेल, असे त्यांनी ’ एक्स ’ (पूर्वीचे ट्विटर) वर लिहिले.तो जिंकण्यासाठी आवश्यक ती सर्व संसाधने वापरेल आणि जीनीने त्याला विक्री करण्याचा निर्णय योग्यच घेतला. असेही ते पुढे म्हणाले.

वॉल्टर यांच्या नेतृत्वाखाली एलए डॉजर्सने दोनदा वर्ल्ड सिरीज जिंकली असून, त्यांनी आक्रमक भरती धोरण स्वीकारले आहे. विशेष म्हणजे जपानी सुपरस्टार शोहेई ओहतानी याला त्यांनी १० वर्षांचा ७०० दशलक्ष डॉलरचा करार देत संघात सामील केले आहे. त्यामुळे, वॉल्टर हे स्पर्धात्मकता आणि प्रगतीचे दुसरे नाव ठरत आहेत, असे जाणकारांचे म्हणणे आहे.

लेकर्सची विक्री एनबीएमधील एका युगाचा शेवट दर्शवते. १९७९ मध्ये जेरी बस यांनी लेकर्स विकत घेतल्यानंतर या संघाने ११ एनबीए चॅम्पियनशिप जिंकल्या. शोटाइम युगात मॅजिक जॉन्सनचा झगमगाट, २०००–०२ दरम्यान कोबी ब्रायंटच्या नेतृत्वाखालील हॅटट्रिक विजेतेपद, आणि अलीकडे लेब्रॉन जेम्सच्या नेतृत्वाखाली २०२० मध्ये मिळवलेले १७वे विजेतेपद, हे सगळे बस कुटुंबाच्या कारकिर्दीचे ठळक भाग आहेत.

२०२१ मध्ये वॉल्टर यांनी अल्पसंख्याक हिस्सेदारी खरेदी केली होती, आणि त्याच वेळी संघ विक्रीस आल्यास पहिल्यांदा खरेदी करण्याचा अधिकार त्यांनी मिळवला होता. त्यामुळे आजचा करार निश्चित करण्यामागे हा निर्णय निर्णायक ठरला.

या व्यवहारामुळे अमेरिकन क्रीडाजगतातील याआधीचे सर्व विक्रम मोडीत काढले जाणार आहेत. लेकर्सच्या विक्रीमुळे केवळ एका फ्रँचायझीची मालकी बदलत नाही, तर एक संपूर्ण युग, एक परंपरा आणि अमेरिकन क्रीडाजगतातील एक महत्त्वाचा अध्याय संपत आहे.

# ‘पतौडी ट्रॉफी’ वादावर सचिन तेंडुलकरने सोडले मौन

### वारसा अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले – सचिन

**मुंबई, दि. १९ :**

भारत–इंग्लंड कसोटी मालिकेतील ट्रॉफीचे नाव तेंडुलकर–अँडरसन ट्रॉफी’ असे बदलण्याच्या निर्णयावर भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने अखेर मौन सोडले आहे. या निर्णयामुळे पतौडी ट्रॉफी’चे नाव इतिहासजमा होत असल्याने क्रिकेट वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. आता स्वतः तेंडुलकरने रेव्हस्पोर्ट्झला दिलेल्या मुलाखतीत आपली भूमिका स्पष्ट केली.

तेंडुलकर म्हणाला की, ट्रॉफीचे नाव बदलण्याचा निर्णय हा पूर्णतः बीसीसीआय आणि ईसीबी यांच्यावर अवलंबून होता. त्यांनी तो निर्णय घेतल्यानंतरच मला त्याबद्दल माहिती दिली.

यावेळी सचिनने मन्सूर अली खान पतौडी व त्यांचे वडील पतौडी सीनियर यांच्या योगदानाची आठवण करून दिली.पतौडी सीनियर यांनी





इंग्लंड आणि भारत दोन्ही संघांसाठी खेळले, तर टायगर’ पतौडी यांनी भारतीय संघाचे प्रेरणादायी नेतृत्व केले. मी त्यांना प्रत्यक्ष खेळताना पाहिले नाही, पण त्यांच्या कथा प्रेरणादायक आहेत. म्हणूनच त्यांचा वारसा जपण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेतला, असंही तो म्हणाला.

तेंडुलकरने खुलासा केला की, या मुद्द्यावर त्याने बीसीसीआयचे सचिव जय शाह आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे वरिष्ठ पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला.मला जेव्हा हे समजले, तेव्हा मी पतौडी कुटुंबाशी संपर्क साधला. त्यानंतर बीसीसीआय आणि ईसीबीशीही बोललो. मी स्पष्टपणे सुचवले की पतौडी वारसा टिकवण्यासाठी काही ना काही केले पाहिजे, असे तेंडुलकर म्हणाला .

याच्या परिणामी, ट्रॉफीचे नाव बदलले असले तरी मालिकेतील विजेत्या कर्णधाराला पतौडी मेडल ऑफ एक्सलन्स’ देण्यात येणार असल्याचे ठरले आहे.

तेंडुलकरने ट्रॉफीवर आपले नाव येण्याच्या बाबतीतही अत्यंत नम्रता व्यक्त केली.माझ्या कारकिर्दीत इंग्लंडचे खास स्थान राहिले आहे. १९८८ मध्ये इंग्लंडला माझा पहिला विमान प्रवास झाला. त्यानंतर माझे पहिले आंतरराष्ट्रीय शतकही ओल्ड ट्रॅफर्ड येथेच झाले. मी यॉर्कशायरकडून खेळणारा पहिला बिगर–इंग्लिश खेळाडू ठरलो. आणि हो, माझी सासू इंग्लिश आहे! त्यामुळे माझे इंग्लंडशी अनेक स्तरांवर नाते आहे, अशी आठवण सचिनने सांगितली.

ट्रॉफीचे नाव जिमी अँडरसन यांच्यासह जोडले गेले, हे मला विशेष वाटते. ते इंग्लंडच्या इतिहासातील महान गोलंदाज आहेत, आणि त्यांच्या कारकिर्दीचा सन्मान होणे योग्यच आहे.असंही तेंडुलकर म्हणाला.

तेंडुलकर–अँडरसन ट्रॉफी’ अंतर्गत पहिला कसोटी सामना २० जूनपासून सुरू होत असून, नव्या नावाने ही ऐतिहासिक मालिका खेळवली जाणार आहे.पतौडी ट्रॉफीच्या विलोपनामुळे निर्माण झालेल्या भावनिक पोकळीला या नव्या सन्मानाने काही प्रमाणात भरून काढण्याचा प्रयत्न झाला आहे.

# अर्जेंटिनाविरुद्ध भारताचा पेनल्टी शूटआउटमध्ये पराभव

**नवी दिल्ली, दि. १९ :**

एफआयएच प्रो लीगच्या महिला विभागातील महत्त्वाच्या हॉकी सामन्यात भारताने अर्जेंटिनाविरुद्ध जोरदार झुंज दिली. नियमित वेळेत २–२ अशी बरोबरी साधत सामना टायब्रेकरपर्यंत खेचला. मात्र, पेनल्टी शूटआउटमध्ये भारतीय संघाला एकाही प्रयत्नाचे रूपांतर करता आले नाही, आणि अर्जेंटिनाने सामना जिंकत बोनस गुण आपल्या खात्यात जमा केले.

सामन्याच्या पहिल्या दोन क्वार्टरमध्ये भारताने चांगली सुरुवात केली. पहिल्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने सहा वेळा अर्जेंटिनाच्या सर्कलमध्ये प्रवेश केला, तर प्रतिस्पर्ध्यांना फक्त एकदाच भारतीय सर्कलमध्ये संधी मिळाली. मात्र, गोलमध्ये रूपांतर करण्यात भारतातील आघाडीची फळी अपयशी ठरली.

नवनीत कौर, शर्मिला देवी, लालरेमसियामी, तसेच युवा सुनीलिता टोप्पो यांनी संधी निर्माण केल्या, पण शेवटच्या क्षणी अनिर्णय आणि अचूकतेअभावी त्या वाया गेल्या.पहिल्या हाफमध्ये भारताला संधी असूनही, २६ व्या मिनिटाला अर्जेंटिनाने पेनल्टी कॉर्नरवर ऑगस्टिना गोर्झेलानीच्या फटक्याने आघाडी घेतली. त्यानंतर ३७ व्या



मिनिटाला आणखी एका कॉर्नरवर गोर्झेलानीने दुसरा गोल करत आघाडी दुप्पट केली.सविता पुनियाने काही चांगल्या बचावाने संघाला खेळात टिकवून ठेवले, तर दीपिकाच्या प्रयत्नांनी आणखी संधी मिळवल्या.

सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात भारताने जोरदार पुनरागमन केले. ५० व्या मिनिटाला नवनीत कौरने फील्ड गोल, तर ५५ व्या मिनिटाला दीपिकाने पेनल्टी कॉर्नरवर अचूक फटका मारून बरोबरी साधली.

परंतु, टायब्रेकरमध्ये दीपिका, रुतुजा पिसाल, लालरेमसियामी आणि बलजीत कौर यांच्यासह सर्व खेळाडूंनी आपापल्या संधी गमावल्या. अर्जेंटिनासाठी ब्रिसा ब्रुगेसर आणि सोफिया कैरो यांनी अचूकता दाखवत बोनस गुण मिळवले.

या पराभवामुळे भारताच्या एकूण १२ सामन्यांत फक्त १० गुण झाले असून, नऊ संघांच्या स्पर्धेत भारत सातव्या स्थानावर आहे. पुढील सामने जिंकण्यात अपयश आल्यास, भारतीय संघाला पुढील हंगामात दुसऱ्या श्रेणीतील नेशन्स लीग’मध्ये खेळण्याची नामुष्की ओढवू शकते.

प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी खेळाडूंनी डी’मध्ये निर्णायक कृती न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. शूटिंग सर्कलमध्ये चपळ आणि तीव्र असणे आवश्यक आहे. आम्ही संधी निर्माण केल्या, पण ती पूर्णत्वास नेण्यात अपयश आले, असे ते म्हणाले.

भारत आता बेल्जियमविरुद्ध पुढील सामना खेळणार असून, त्यानंतर चीनविरुद्धच्या दोन सामन्यांसाठी जर्मनीच्या दौऱ्यावर जाईल. या उर्वरित सामन्यांमध्ये चांगले प्रदर्शन करून गुणवर्धन करणे हेच आता भारतासाठी प्राथमिक उद्दिष्ट असेल.

भारताच्या झुंजार खेळाने सामन्याची रंगत वाढवली, मात्र निर्णायक क्षणी अचूकतेच्या अभावामुळे महत्त्वाचे बोनस गुण हुलकावणी देत राहिले. आता उर्वरित सामने जिंकणे आणि स्पर्धेतील स्थान वाचवणे, हेच भारतीय महिला संघासमोरील मोठे आव्हान आहे.

# हॅले ओपनमध्ये झ्वेरेव्हची विजयी आगेकूच : अंतिम १६मध्ये प्रवेश

**हॅले (जर्मनी), दि. १९ :**

जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी असलेल्या अलेक्झांडर झ्वेरेव्ह याने हॅले ओपन टेनिस स्पर्धेत दमदार सुरुवात करत अमेरिकेच्या मार्कोस गिरॉनचा ६–२, ६–१ अशा सरळ सेटमध्ये पराभव केला आणि अंतिम १६ फेरीत आपले स्थान निश्चित केले.

टोकियो ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता झ्वेरेव्ह याच्यासाठी ही गवतावर खेळली जाणारी पारंपरिक विम्बल्डनपूर्व सराव स्पर्धा असून, त्याने त्याचा अनुभव वापरत प्रतिस्पर्ध्यावर सहज वर्चस्व गाजवले. जागतिक क्रमवारीत ४३व्या स्थानावर असलेल्या गिरॉनला झ्वेरेव्हने फारशी संधी दिली नाही.

सामन्यादरम्यान स्टँडमध्ये एक जाहिरात फलक अचानक कोसळून प्रेक्षकावर पडला. ही घटना घडल्यानंतर झ्वेरेव्हने तात्काळ प्रतिक्रिया दिली आणि त्या जखमी प्रेक्षकासाठी बर्फाचा पॅक देऊन



मदतीचा हात पुढे केला. त्याच्या या संवेदनशील कृतीमुळे प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्याचे कौतुक केले. हॅले ओपनमध्ये यापूर्वी दोन वेळा अंतिम फेरी गाठणाऱ्या झ्वेरेव्हची पुढील लढत इटलीच्या लोरेन्झो सोनेगोशी होणार आहे. झ्वेरेव्हने यावर्षी फ्रेंच ओपनमध्ये उपांत्यपूर्व फेरीत चार सेटमध्ये पराभव पत्करला होता, त्यानंतर ही स्पर्धा त्याच्या पुनरागमनाची चाचणी ठरत आहे.

दरम्यान, जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावरील इटालियन स्टार जॅनिक सिन्नरनेही स्पर्धेत विजयी पुनरागमन केले आहे. फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझकडून पराभव झाल्यानंतर सिन्नरने यानिक हॅन्फमनचा सरळ सेटमध्ये पराभव केला.

हॅले ओपन स्पर्धा विम्बल्डनपूर्वीची महत्त्वाची तयारी मानली जाते आणि झ्वेरेव्ह तसेच सिन्नर यांच्या कामगिरीमुळे ही स्पर्धा अधिक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २८८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 288 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .